असा. क्र. १३६ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००२

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

मंगळवार, मे २१, २००२/वैशाख ३१, शके १९२४

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-ब

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० मे २००२

### आदेश

मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८.

क्रमांक मुद्रांक २००१/प्र.क्र.६६६/म-१.—मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा ६०) (या नंतर ज्याचा उल्लेख उक्त अधिनियम असा करण्यात येईल) च्या कलम ९ च्या पोट-कलम (अ) अन्वये असलेल्या अधिकाराचा वापर करुन सार्वजनिक हिताच्या दृष्टीकोनातून तसे करणे आवश्यक आहे अशी खात्री झाल्याने महाराष्ट्र शासन या आदेशाद्वारे सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते दिनांक ३१ मार्च २००६ या कालावधीसाठी शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. एसईझेड. २००१/(१५२)आयएनडी-२, दिनांक १२ ऑक्टोबर २००१ अन्वये विहित केलेल्या विशेष आर्थिक क्षेत्र योजनेअंतर्गत



भाग चार-ब—१६५

विशेष आर्थिक क्षेत्रात कोणताही नवीन उद्योग सुरु करण्यासाठी अथवा अस्तित्वात असलेल्या घटकाचा विस्तार करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या दस्तांवर उक्त अधिनियमाच्या अनुसूची १ मधील अनुच्छेद ६ (हक्कलेख निक्षेप, हडपतारण, वचनपत्र किंवा तारणगहाण), अनुच्छेद २५ (अभिहस्तांतरण पत्र), अनुच्छेद ३३ (अधिक प्रभार), अनुच्छेद ३६ (भाडेपट्टा), अनुच्छेद ४० (गहाणखत) आणि अनुच्छेद ५४ (प्रतिभूतिबंधपत्र) अन्वये देय असलेल्या मुद्रांक शुल्कातून सूट देण्यात येत आहे.

**स्पष्टीकरण.**—या आदेशाच्या प्रयोजनार्थ " उद्योग घटक " म्हणजे, विशेष आर्थिक क्षेत्रात असलेला व तसे विकास आयुक्त (उद्योग) अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने केलेला " घटक " होय.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अ. के. केळबाईकर,**
कार्यासन अधिकारी.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 20th May 2002

### Order

BOMBAY STAMP ACT, 1958.

No. Mudrank 2001/C.R.666/M-1.—In exercise of the powers conferred by clause (a) of section 9 of the Bombay Stamp Act, 1958 (Bom. LX of 1958), the Government of Maharashtra, being satisfied that it is necessary so to do in the public interest, hereby, with effect from the date of publication of this order in tlic *Maharashtra Government Gazette* rill the 31st March 2006, remits tlic stamp duty chargeable under Article 6 (Agreement Relating lo Deposit of Title Deeds, Pawn, Pledge or Hypothecation), Article 25 (conveyance), Article 33 (Further charge on mortgaged property), Article 36 (Lease), Article 40 (Mortgage-Deed) and Article 54 (Security-Bond or Mortgage-Deed) in the Schedule I appended to the said Act on the instruments executed by any person for starting an industrial unit or units or its or their expansion situated in the area of the Special Economic Zone established by the Government in pursuance of the policy framed under the Government Resolution, Industries, Energy and Labour Department No. S. Z. 2001/(152)/IND-2, dated the 12th October 2001.

*Explanation.*—For the purpose of this order, " an industrial unit " means an industrial unit situated in the Special Economic Zone and certified by tlic Development Commissioner (Industries), Mumbai, or by any other officer authorised by him in this behalf, as a " Unit in the Special Economic Zone ".

By order and in the name of the Governor of the Maharashtra,

A. K. KELDAIKAII.
Desk Officer.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई